महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन आदेश क्रमांकः बदली-२०१९/प्र.क्र.१६/१४-अ

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: २८ ऑगस्ट, २०१९

शासन आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४ (४) व ४ (५) अनुसार खाली नमूद केलेल्या मंत्रालयीन विभागातील लिपिक-टंकलेखकाची आंतरविभागीय बदली करण्यात येत असून, त्यांच्या नावासमोरील स्तंभ-५ मध्ये दर्शविलेल्या विभागात त्यांची बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे:-

अ.क्र.	श्री / श्रीमती	लिपिक-टंकलेखकाचे नांव	सध्याचा विभाग	बदलीनंतर पदस्थापनेचा विभाग
१	२	३	४	५
१	श्री	अ.शं.चव्हाण	सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग	सार्वजनिक आरोग्य विभाग
२	श्रीमती	शि.सा.भिंगारदेवे	सार्वजनिक आरोग्य विभाग	सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

२. बदली झालेल्या लिपिक-टंकलेखकास संबंधित विभागाने तत्काळ कार्यमुक्त करुन या विभागास कळवावे. तसेच बदली झालेल्या लिपिक-टंकलेखकाने त्यांची पदस्थापना केलेल्या विभागात तत्काळ रुजू व्हावे.

३. विभागाने बदली झालेल्या कर्मचाऱ्यास तत्काळ कार्यमुक्त न केल्यास शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१८६/१६/का.१४, दिनांक २३ डिसेंबर, २०१६ मधील तरतुदीनुसार सामान्य प्रशासन विभागाकडून कार्यवाही करण्यात येईल यांची संबंधितांनी नोंद घ्यावी.

४. मंत्रालयीन विभागातील सर्व संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना राज्य प्रशिक्षण धोरणानुसार बदलीनंतरच्या प्रशिक्षणाची कार्यवाही करण्यासंदर्भात शासन परिपत्रक क्रमांक: कअनि १११६/प्र.क्र.३२/१४-ब, दिनांक २३.०५.२०१६ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार विभागात बदलीने रुजू झालेल्या कर्मचाऱ्यास बदलीनंतरचे प्रशिक्षण देण्याबाबतची कार्यवाही संबंधित मंत्रालयीन विभागांनी करावी.

५.	सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०८२८१७००१६१२०७ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ad a8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f 73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2019.08.28 17:07:11 +05'30'

(ग.भि.गुरव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

संबंधित लिपिक-टंकलेखक (संबंधित मंत्रालयीन विभागामार्फत)

प्रत,

१. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (आस्थापना), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग/ सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय (संबंधित मंत्रालयीन विभागांमार्फत)
२. सह/उप सचिव (आस्थापना), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग/ सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय
३. निवड नस्ती/संग्रहार्थ (कार्यासन १४-अ)